# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/01/2023 (शनिवार) सकाळ

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा माहुली येथे दिनांक १८/०१/२०२३ चे १०.३० वा. ते १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सतीश गणपतरावजी किवलेकर, वय ४२ वर्ष, रा. माहुली यांच्या घराचे दार उघडे असल्याचे पाहुन कोणीतरी अज्ञात आरोपीने घरात प्रवेश केला व घरातील देवघरात ठेवलेल्या धान्याच्या कोठीतील कानातील सोन्याचे दोन झुमके ५ ग्रॅम किंमती अंदाजे २५,०००/— रू. चे स्वत:चे आर्थीक फायदा करिता चोरून नेले

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गंगाप्रसाद वरखडे ब. नं. ५०३ मो.क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील कान्द्री वस्ती येथे दिनांक २०/०१/२०२३ चे ०८.०० वा. ते ०८.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— गं. भा मीराबाई साहेबराव मसराम, वय ५० वर्ष, रा. कांन्द्री वस्ती वार्ड क्र. ०४ ही आपले अंगणात झाड झुड करित असता यातील आरोपी क्र. १) संजु मोरेशिया तेथे आला व फिर्यादीस ''तु ईकडे खाली जागेकडे का झाडते'' असे म्हटले असता फिर्यादीने म्हटले ''ही जागा माझी आहे'' असे म्हटले असता आरोपी याने म्हटले ''ही जागा आमची आहे तु ईकडे झाडु मारायचे नाही'' असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केले फिर्यादीने म्हटले ''मला शिवीगाळ करू नको'' असे म्हटले असता आरोपीतांनी संगनमत करून आरोपी क्र. १ याने फिर्यादीच्या उजव्या हातावर काठीने मारून जखमी केले व आरोपी क्र. ०२) सुनिल मोरेशियाॅ दोन्ही रा. कान्द्री वस्ती वार्ड क्र. ०४ याने फिर्यादीस हातबुक्क्याने मारत असता फिर्यादीची मुलगी मधात आली असता आरोपी क्र. ०२ याने फिर्यादीच्या मुलीच्या गालावर २ थापड मारले व मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२५, ३२३, ३४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. १९८८ नितेश पिपरोदे पोस्टे रामटेक मो. नं. ९९२१७११९५५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर